# भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यावसायिकांना निर्माण होणाऱ्या समस्यांचे अध्ययन व त्यावरील उपाययोजना

**धनराज इस्तारी घुबडे**
संशोधक
स्नातकोत्तर वाणिज्य विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर

**डॉ. राजेश गोमाजी वालोदे**
सहाय्यक प्राध्यापक
एम.बी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, साकोली जिल्हा भंडारा

---

**सारांश:**

*चर्मोद्योग हा भारतातील तसेच महाराष्ट्रातील एक महत्वाचा लघु व मध्यम स्वरूपाचा उद्योग आहे. भंडारा जिल्ह्यातही या व्यवसायाचा मोठा विस्तार आहे. परंतु आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा, वित्तीय अडचणी आणि पर्यावरणीय समस्यांमुळे चर्मोद्योग व्यावसायिकांना अनेकविध समस्यांना सामोरे जावे लागते. प्राचीन व्यवसायांपैकी एक आहे आणि अनेक लोकांना रोजगार उपलब्ध करून देतो. भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यावसायिकांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. या संशोधनाचा उद्देश या व्यावसायिकांना येणाऱ्या अडचणींचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना सुचवणे हा आहे. हा शोधनिबंध भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यवसाय करत असलेल्या चांभार/चर्मकार लोकांच्या व्यवसायाचा अभ्यास करतो. पूर्वीच्या काळी भारतात प्रत्येक समाजाचे कार्य निश्चित होते. चांभार / चर्मकार व्यक्तीने रस्त्याच्या कडेला दुकान टाकून समाजातील व्यक्तीच्या पायांनुसार जोडे, चप्पल तयार करून देणे, समाजाला आवश्यक इतर चामड्याचा वस्तू बनवून देणे , त्याबदल्यात त्याला विविध स्वरुपात मोबदला मिळत असे. त्या वेळी त्या कामाला प्रतिष्ठा होती. परंतु औद्योगिकरणामुळे बूट, चप्पल आणि इतर चर्मवस्तू बनविण्याचे विविध छोटे मोठे कारखाने सुरू झाले. इतरही समाजातील व्यक्ती या व्यवसायात सहभागी झाले. चर्मकार समाजाने पारंपारिक व्यवसाय सोडून इतर क्षेत्रात कार्य करण्यास सुरवात केली. त्यामुळे आज या कुशल कारागिरांची संख्या कमी झालेली आहे. विविध कारखान्यात कुशल कारागिरांची उणीव भासू लागली आहे. बहुतांशी चर्मकार बांधव चर्मकाराचे काम आपल्या आईवडिलांपासून लहानपणापासूनच शिकतात. त्यासाठी चर्मकार्याचे कोणतेही पारंपारिक पद्धतीने शिक्षण घेत नाहीत. शिक्षण नाही, कुशलता कमी असल्यामुळे बँकाकडून कर्ज सुविधाही उपलब्ध होत नाही. म्हणूनच चर्मकार समाजाला स्वयंरोजगार उपलब्ध करणे काळाची गरज आहे. भंडारा जिल्ह्यात चर्मोद्योग व्यवसायाची स्थिती कशी आहे. हे तपासून बघणे गरजेचे आहे. याच हेतूने प्रतावित संशोधन करण्याचा विचार केलेला आहे. या अध्ययनातून प्राप्त परिणामांवरून भंडारा जिल्यातील चर्मोद्योग व्यवसायाचे यथायोग्य आकलन करता येईल.*

---

**परिचय:**

महाराष्ट्रातील भंडारा जिल्हामध्ये शहरी आणि ग्रामीण समुदायाचे मिश्रण आहे. भंडारा जिल्हा हा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि वैविध्यपूर्ण लोकसंख्याशास्त्रीय परीदृश्यासाठी ओळखला जातो. हा शोधनिबंध भंडारा जिल्यातील चर्मोद्योग व्यवसाय व त्याचे विश्लेषणात्मक अध्ययन यावर अभ्यास करतो. २०११ च्या जनगणनेप्रमाणे भंडारा जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १२,००,३३४ असून, अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या २,००,३७२

(१६.७%) आहे. भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यावसायिकांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन करणे, चर्मोद्योग व्यावसायिकांना व्यवसायाकरिता ऋण मिळविण्यासाठी येणाऱ्या समस्यांचे अभ्यास करणे, व्यावसायिकांच्या आर्थिक नियोजनाचा व व्यवस्थापनाचा अभ्यास करणे, हे संशोधनाचे महत्वपूर्ण उद्देश आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यवसायिकांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन करणे.
- भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यवसायिकांच्या कार्यस्थळावरील समस्यांचे अध्ययन करणे.
- भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यवसायाची सद्यस्थिती समजून घेणे.
- चर्मोद्योग व्यावसायिकांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या ओळखणे.
- चर्मोद्योग व्यावसायिकांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या ओळखणे.
- भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यवसायिकांना असलेल्या शासकीय योजना व मिळणारा लाभ यांचा अभ्यास करणे.
- भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यवसायिकांना व्यवसायाकरिता ऋण मिळवितांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे .

**संशोधन पद्धती :**

- वर्णनात्मक व विश्लेषणात्मक
- **प्राथमिक डेटा :** चर्मोद्योग व्यावसायिकांशी मुलाखती व सर्वेक्षण
- **दुय्यम डेटा :** सरकारी अहवाल, उद्योग संघटनांचे अहवाल, संबंधित संशोधन पेपर

**चर्मोद्योग व्यावसायिकांना निर्माण होणाऱ्या समस्या :**

- **आर्थिक समस्या :**

1. भांडवल कमी उपलब्ध असणे
2. बँकांकडून कर्ज मिळण्यास अडचणी
3. कच्च्या मालाच्या किमतीत मोठ्या प्रमाणावर चढ-उतार

- **तांत्रिक समस्या :**

1. नवीन तंत्रज्ञानाचा अभाव
2. प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाची कमतरता

- **बाजारपेठ व विक्री संबंधी समस्या :**

1. उत्पादित मालाच्या विक्रीसाठी योग्य बाजारपेठ उपलब्ध नसणे
2. मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा

- **पर्यावरणविषयक आणि कायदेशीर अडचणी :**

1. पर्यावरणीय नियमांचे पालन करणे कठीण
2. सरकारी परवानगी मिळण्यात अडचणी

- **सामाजिक आणि कामगार समस्या :**

1. कुशल कामगारांची कमतरता
2. मजुरी दरांबाबत असंतोष

**संभाव्य उपाययोजना :**

- **आर्थिक मदत आणि उपाययोजना :**

1. सरकारकडून अनुदान व कर्ज सुलभतेने मिळण्यासाठी प्रयत्न करणे
2. स्थानिक सहकारी संस्था व वित्तीय संस्थाचे सहकार्य करणे

- **तंत्रज्ञान व कौशल्य विकास :**

1. आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे
2. कौशल्यविकास कार्यक्रमाचे आयोजन करणे

- **बाजारपेठेचा विस्तार :**

1. ऑनलालाईन व डिजिटल मार्केटींगचा वापर करणे
2. प्रदर्शन व व्यापार मेळाव्यात सहभाग घडवून आणणे

- **पर्यावरणपूरक उपाय :**

1. ग्रीन टेक्नोलॉजीचा वापर करणे
2. सरकारच्या पर्यावरण धोरणानुसार उद्योग उभारणी करणे

- **कामगार समस्या सोडविण्यासाठी :**

1. स्थिर व आकर्षक वेतन प्रणालीची अंमलबजावणी करणे
2. कामगारांसाठी आरोग्य व विमा सुविधा निर्माण करणे

**निष्कर्ष :**

भंडारा जिल्ह्यातील चर्मोद्योग व्यावसायिकांना आर्थिक, तांत्रिक, बाजारपेठ व कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागतो. योग्य सरकारी धोरणे, वित्तीय सहाय्य, तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रशिक्षण यांच्या मदतीने या अडचणी सोडविता येवू शकतात. भंडारा जिल्ह्यातील चर्मकार व्यावसायिकांसाठी सरकारी योजनाच्या विश्लेषणात पायाभूत सुविधा, शिक्षण, आर्थिक साहाय्य आणि जागरुकता यातील तफावत उघड झालेली आहे. भारत सरकार व राज्य शासन प्रयत्न करूनही ग्रामीण भागात अजूनही या सेवाचा अभाव आहे. त्यासाठी अनेकविध योजनांची अंमलबजावणी कंरणे, शिक्षण, आर्थिक साहाय्य, सुलभ कर्ज योजना, व्यावसायिक अनुदान योजना आणि जागरुकता यांना प्राधान्य दिले पाहिजे.

**संदर्भ :**


- जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, भंडारा जिल्हा, 2019
- महाराष्ट्र औद्योगिक धोरण अहवाल
- MSME मंत्रालय, भारत सरकार –अधिकृत अहवाल
- भंडारा जिल्हा उद्योग केंद्र अहवाल
- Sharma, C. L. (1996). *Social Mobility Among Scheduled Castes: An Empirical Study in an Indian State*. M.D. Publications Pvt. Ltd.
- Nadkarni, M. V. (18 June 2019). Socio-Economic Change and the Broad-Basing Process in India Taylor & Francis.
- Suryawanshi, B.R. (2011) Role of MPBCDC in economic development of backward classes in Maharashtra with special reference to Nanded District, International conferences on sociality and economic development vol.10
- Socio-Economic Status of scheduled Castes in rural Haryana, A case study of Rotak district in Geographic perspective: Ansari S. Hasan, published thesis, M.D. University, (2012).
- Sujata A.S. (2013), Socio-economic Rights of Dalits, ALPBooks, New Delhi.
- Socio-economic status of scheduled caste in Kanupur Village in Birbhum District Journal of Business management & Social Science research (JBM & SHR) ISSN: No-2319-5614, Vol.4(5). (2015).
- मराठवाडा विभागातील (2017) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचा कार्याचा चिकित्सक अभ्यास, इ. स. 1991-2011, प्रा. सुभाश तात्याराव पंडित, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड.
- The role Lidcom in promotion of leather industry in Maharashtra, Shri. Waghmare Shivaji Naganath, Unpublish thesis, Dr. B.A.M.U. Aurangabad, 2017.
- ढोर समाज मुख्यपृष्ठ/ढोर.इन/ढोर समाजाची वेबसाईट,16 मे 2012
- (dhor.in a social unity/samaj/caste/community.website)